# ‘करिअर निवडताना स्वतःची क्षमता ओळखा’

**– पुणे आयकर उपायुक्त मा. संदीपकुमार साळुंखे**

कोल्हापूर, दि. ०८ – विद्यार्थ्यांनी करिअर निवडताना स्वतःची क्षमता ओळखून काय करायचे ते ठरवा, आपल्यामध्ये बदलण्याची जबरदस्त ताकद असते. त्यासाठी मनातील ठिणगी पेटवा म्हणजे यश निश्चित मिळेल, असे प्रतिपादन पुणे आयकर उपायुक्त मा. संदीपकुमार साळुंखे यांनी केले. महावीर महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान व शिक्षणशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन, मा.ॲड.के.ए. कापसे होते. व्यासपीठावर संस्थेचे पदाधिकारी श्री. गुणवंत रोटे, प्र. प्राचार्य डॉ. गोपाळ गावडे, सांगलीच्या डी.वाय.एस.पी. जयश्री जाधव इ. मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सांगलीच्या डी.वाय.एस.पी. कॉलेजची विद्यार्थीनी जयश्री जाधव व ज्येष्ठ कर्मचारी कोडिबा जाधव यांच्यासह १९ विद्यार्थ्यांचा गुणगौरव, स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन करण्यात आला.

मा. संदीपकुमार साळुंखे म्हणाले, आपल्या मनातील ज्योत कधी, कोणत्याही वेळेला पेटेल, हे सांगता येत नाही. त्या ज्योतीची अनेकजण वाट पहात असतात. काहीतरी चांगले होते की, काही तरी चांगले मिळेल, मला "मी" कळतो तर तोच क्रांतीचा क्षण असतो. आयुष्यात अनेक चढ-उतार येत असतात. त्याचा विचार करु नका, नुसते ठरवा, म्हणजे अशक्य काहीही नाही. मात्र त्यासाठी निश्चय करा. आपल्यातील क्षमता ओळखा म्हणजे यश निश्चित मिळेल.

पदवीचा अभ्यास करतानांच स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करा त्यात अनेक नैराश्याचे क्षण येतील. त्यातुन काय करायचे ते समजेल तेंव्हा तुमचा मार्ग सापडेल. म्हणून आयुष्याचा आलेख उंच करायचा असेल तर संयमाची दोरी तुमच्या हातात हवी. स्वतःचे स्वरुप, मर्यादा ओळखून आपल्या जीवनाचा आपणच कोलंबस व्हायचे ध्येय ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षस्थानावरुन बोलताना ॲड.के.ए. कापसे म्हणाले ध्येय आत्मसात करण्यासाठी कठोर परिश्रमाची गरज असून त्यासाठी आपल्यातील क्षमता ओळखणे गरजेचे असते. परिश्रमाशिवाय पर्याय नाही. त्याशिवाय आपणाला मोठे होता येत नाही, म्हणून विद्यार्थ्यांनी दुर्दम्य इच्छाशक्ती बाळगून जीवनात यश मिळवावे. यावेळी डी.वाय.एस.पी. जयश्री जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी श्री. गुणवंत रोटे, प्र. प्राचार्य डॉ. गोपाळ गावडे, प्रा. विजय पाटील, डॉ. शैलजा मंडले, प्रा. शशिकांत कापसे, तसेच संस्थेचे पदाधिकारी प्राध्यापक विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. गोपाळ गावडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा.सौ. शशिकला सरगर व डॉ. श्रध्दा पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी आभार मानले.

---

महावीर महाविद्यालय, कोल्हापूर.

दिनांकः- १६/०८/२०११.

प्रति

मा. संपादक
दैनिक ________
कोल्हापूर.

महोदय,

आपण आमच्या महाविद्यालयाची उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात छापून उपकृत करावे.

**प्राचार्य**